माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ४६७/२०२१**

**अपिलार्थी, श्री. सदानंद एस. गणवीर,**
अंबिका नगर, यवतमाळ, ता. जि. यवतमाळ-४४५००१

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कोरची ता. कोरची जि. गडचिरोली**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. १, पोटेगाव रोड,जि. गडचिरोली**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १७.१०.२०२२**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २०.१०.२०२० | १२.०२.२०२१ | २१.११.२०२० | १५.१२.२०२० |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) नुसार जन माहिती अधिकारी **तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कोरची ता. कोरची जि. गडचिरोली** यांच्याकडे **दिनांक २०.१०.**२०२० रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "माहे १ एप्रिल २०२० पासुन ते ३० सप्टेंबर २०२० पावेतो सार्वजनिक बांधकाम उपविभागातंर्गत शासकीय योजनेनुसार सर्वच रस्ते बांधकामाची कामनिहाय माहिती सविस्तर साक्षांकित छायाप्रती" याबाबत माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि. १२.०२.२०२१ रोजी माहिती प्राप्त करून घेण्याबाबत कळविले होते. त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक २१.११.२०२०** रोजी माहिती अधिकार अधिनियम, कलम १९ (१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी **तथा कार्यकारी अभियंता**, सार्वजनिक **बांधकाम विभाग क्र. १,**

**पोटेगाव रोड,जि. गडचिरोली** यांचेकडे "मागणी करण्यात आलेली माहिती अप्राप्त असल्यामुळे." असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १५.१२.२०२० रोजी सुनावणी आयोजित करुन उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कोरची यांनी अपिलार्थी यांना १० दिवसात माहिती उपलब्ध करून देण्याबाबत आदेशित करून प्रथम अपिल अर्ज निकाली काढण्यात आले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०८.०२.२०२१** रोजी "माहिती अप्राप्त असल्यामुळे कोणताही आदेश प्राप्त नाही." असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक **१७.१०.२०२२** रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी श्री. सदानंद एस. गणवीर उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा **उपविभागीय अभियंता,** सार्वजनिक **बांधकाम उपविभाग, कोरची ता. कोरची जि. गडचिरोली श्री. प्रशांत मो. ढोंगे उपस्थित** आहेत व प्रथम अपिलीय अधिकारी तथा **कार्यकारी अभियंता**, सार्वजनिक **बांधकाम विभाग क्र. १, पोटेगाव रोड,जि. गडचिरोली** अनुपस्थित आहेत.

अपीलार्थी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जावर आज झालेल्या सुनावणी दरम्यान सादर कागदपत्राचे अवलोकन व उपस्थितांचे युक्तिवाद विचारात घेता, प्रस्तुत प्रकरणी अपीलार्थी यांनी माहे १ एप्रिल २०२० पासुन ते ३० सप्टेंबर २०२० पावेतो सार्वजनिक बांधकाम उपविभागातंर्गत शासकीय योजनेनुसार सर्वच रस्ते बांधकामाची कामनिहाय माहिती सविस्तर साक्षांकित छायाप्रतीबाबत माहिती मागितली आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी तथा **उपविभागीय अभियंता**, सार्वजनिक **बांधकाम उपविभाग, कोरची ता. कोरची जि. गडचिरोली** यांनी अपिलार्थी यांना विहित मुदतीत प्रतीसाद दिल्याचे उपलब्ध कागदपत्रानुसार दिसून येत नाही. तथापि, जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपीलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत म्हणजेच ३० दिवसात अपीलार्थीस/पत्रव्यवहार करणे/शुल्क कळविणे/निरिक्षण देणे/ कार्यवाही प्रलंबित असल्यास तसे पत्रान्वये कळविणे याबाबी अपेक्षित आहे. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत आहे की, त्यांनी अशा प्रकारची पुनरावृत्ती होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी.

A/S-2021/461-2021/Ganvir

अपिलार्थी यांनी दि. २१.११.२०२० रोजी प्रथम अपिल अर्ज दाखल केला. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी तथा **कार्यकारी अभियंता,** सार्वजनिक **बांधकाम विभाग क्र. १, पोटेगाव रोड,जि. गडचिरोली** यांनी दि. १५.१२.२०२० रोजी सुनावणी आयोजित करून सदर प्रथम अपिल अर्जावर आदेश पारित केल्याचे दिसून येते. अपिलार्थी श्री. गणवीर यांनी आयोगासमोर जोडपत्र-अ नुसार माहिती प्राप्त झाली असून, अपिल अर्ज निकाली काढण्याबाबत विनंती केली आहे. अपिलार्थी यांच्या विनंती लक्षात घेवून प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १७.१०.२०२२**

जावक क्रमांक 7611 दिनांक 22 DEC 2022